# देगलूर महाविद्यालयात २६ जुलै रोजी पदवी वितरण सोहळा

देगलूर- देगलूर महाविद्यालय, देगलूर अंतर्गत पदवी - पदव्युत्तर शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी २४वा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ २६ जुलै २०२२ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजीत करण्यात आला आहे.

या कार्यक्रमासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ हे असतील. तर अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव श्री शशिकांत चिद्रावार, स्वारातीम विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. अशोक टिपरसे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



कार्यक्रमास महाविद्यालय विकास समितीचे सदस्य तथा संस्थेचे सहसचिव श्री सूर्यकांत नारलावार, कार्यकारिणी सदस्य तथा सी. डी. सी. सदस्य श्री राजकुमार महाजन, श्री जनार्धन चिद्रावार, श्री देवेंद्र मोतेवार उपस्थित राहणार आहेत. अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री नारायणराव मैलागीरे, कोषाध्यक्ष श्री विलास तोटावार व कार्यकारिणी सदस्य डॉ. कर्मवीर उनग्रतवार , श्री गंगाधर जोशी, श्री रवींद्रअप्पा द्याडे, श्री चंद्रकांत नारलावार यांची उपस्थिती असणार आहे. उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. संजय पाटील, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. किशन सुनेवार, डॉ. सुदाम लक्ष्मणकुमार, श्री राजू जंगीलवार उपस्थित राहणार आहेत.

हिवाळी २०२० आणि उन्हाळी २०२१ या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र प्रत्यक्ष घेण्यासाठी विद्यापीठास विहित नमुन्यात अर्ज सादर केला आहे, अशा विद्यार्थ्यांना सदर कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी सकाळी ९ वाजता महाविद्यालयात येऊन प्रशांत चौव्हाण व प्रकाश सोनकांबळे यांच्याकडे नोंदणी करून समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. समारंभाच्या यशस्वीतेसाठी परीक्षा समितीतील व नियोजन समितीतील सर्व सदस्य, कार्यालयीन अधीक्षक श्री गोविंद जोशी प्रयत्नशील आहेत.